पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date :

## सुधारीत परिपत्रक क्र. - 58 /२०२१

**वाचा : प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र.५६, पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/वेळापत्रक/२०२१/१४९१, दिनांक २९/११/२०२१.**

**संदर्भ १ :महाराष्ट्र शासनाचे डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१ दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजीचे आदेश**
**संदर्भ २: मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे जा.क्र./२०२१/डिसीबी/०२/आरआर/६२३२, दि.२८/११/२०२१ चे आदेश**
**संदर्भ ३ : मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांचे जा.क्र./नआ/वै/६११ दिनांक २९ नोव्हेंबर २०२१ रोजीचे आदेश**

वरील संदर्भ क्र. ०१ ते ०३ च्या आदेशात कोव्हीड-१९ चा विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतूदींच्या अमंलबजावणीसाठी आधिसूचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली आहे. सदरची नियमावली खालीलप्रमाणे आहे.

१. **कोविड-१९ अनुरुप वर्तनाचे (Covid Appropriate Behaviour) पालन :**

राज्य शासनाचे व केंद्र सरकारने वेळोवेळी, निर्धारित केलेल्या कोविड अनुरुप वर्तनाचे (CAB), सेवा प्रदाते, परिवास्तुंचे (जागांचे) मालक, परवानाधारक, अयोजक, इ. सर्वांनी तसेच सर्व अभ्यागत, सेवा घेणारे, ग्राहक, अतिथी इत्यादींनी काटेकोर पालन केले पाहिजे. कोविड अनुरुप वर्तनाची तपशीलवार मार्गदर्शक तत्वे तसेच त्याचे उल्लघन केल्यास करावयाचे दंड, कोविड अनुरुप वर्तनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार आणि यात यापुढे नमूद केलेल्या दंडांनुसार असेल.

२. **संपूर्ण लसीकरणाची अवाश्यकता :**

**अ.** तिकीट असलेल्या किंवा तिकीट नसलेल्या, कोणत्याही कार्यक्रमाच्या, समारंभाच्या किंवा प्रयोगाच्या अयोजनाशी संबंधित असलेल्या सर्व व्यक्ती तसेच सर्व सेवा प्रदाते व सहभागी होणाऱ्या व्यक्ती (जसे की, खेळाडू, अभिनेते, इत्यादी ) अभ्यागत, पाहुणे, ग्राहक यांचे, यात यापुढे दिलेल्या व्याख्येनुसार, संपूर्ण लसीकरण केलेले असावे.

**ब.** जेथे जनतेतील कोणत्याही व्यक्तींना येण्याचा आणि सेवा घेण्याचा हक्क आहे असे कोणतेही दुकान, आस्थपना, मॉल समारंभ, संमेलन मेळावे, इ. ठि काणी , संपूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीव्दारे व्यवस्थापन केले पाहिजे आणि अशा ठिकाणी येणारे सर्व अभ्यागत, ग्राहक यांचे संपूर्ण लसीकरण झालेले असावे.

**क.** सर्व सार्वजनिक परिवहन सेवांमध्ये, संपूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीनाच परवानगी असेल.

**ड.** राज्य शासनाने तयार केलेला युनिव्हर्सल पास (http://epassmsdma.mahait.org किंवा telegrammahaGovUniversalPss Bot) हा, संपूर्ण लसीकरण झाल्याच्या स्थितीचा वैध पुरावा असेल. अन्यथा छायाचित्र असलेले वैध ओळखपत्र असलेले कोविड प्रमाणपत्र देखील त्यासाठी वैध पुरावा मानले

जाईल. अन्यथा छायात्रित असलेले वैध ओळखपत्र असलेले कोविड प्रमाणपत्र देखील त्यासाठी वैध पुरावा मानले जाईल. १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या नागरिकांसाठी इतर शासकीय, संस्थेने किंवा शाळेने दिलेले छायाचित्र ओळखपत्र आणि वैद्यकिय कारणांमुळे ज्या व्यक्ती, लस घेऊ शकत नाहीत त्या व्यक्तीसाठी, प्रमाणित वैद्यकीय व्यावसायीकाकडील प्रमाणपत्र प्रवेशांसाठी कागदोपत्री पुरावा म्हणून वापरता येईल.

**इ.** जेथे सर्वसामान्य जनेतील कोणतीही व्यक्ती भेट देत नाही अशी कार्यालये व इतर आस्थापना तसेच खाजगी परिवहन सेवा यांच्यासाठी, संपूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीसाठी त्या खुल्या असण्याची शर्त नसली तरी, त्यांना देखील संपूर्ण लसीकरण करणे आवश्यक आहे.

३. **जिल्हयात प्रवास :**

सोलापूर जिल्यात येणाऱ्या सर्व प्रवाशांचे, एकतर यात यापुढे व्याख्या केल्यानुसार संपूर्ण लसीकरण केले जाईल किंवा त्यांनी ७२ तासांसाठी वैध असलेले आरट-पीसीआर चाचणी प्रमाणपत्र बाळगणे बंधनकारक राहील.

वरील संदर्भिय विद्यापीठाच्या परिपत्रकान्वये (ऑक्टोंबर / नोव्हेंबर 2021) सर्व वर्षाचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची परीक्षा ही संमिश्र (Blended) पध्दतीने जानेवारी 2022 ला नियोजीत असल्याचे कळविले आहे. परंतु वरील संदर्भ क्रमांक 1 ते 3 नुसार शहर व ग्रामीण भागामधील विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी अडचणी निर्माण होऊ शकते तसेच मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून **माहे ऑक्टोंबर / नोव्हेंबर 2021 ची परीक्षा ही संपूर्ण पणे ऑनलाईन पध्दतीने (Online) पध्दतीने घेण्यात येणार आहे.**

तरी सदरचे परिपत्रक परीक्षेशी निगडीत सर्व शिक्षक, विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी/ कर्मचारी व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यानुसार योग्यती कार्यवाही करावी.

**(डॉ. शिवकुमार गणपूर)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/ वेळापत्रक/२०२१/** 1513
**दिनांक :** 03 DEC 2021

**प्रत - माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**

१. मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक/विभागप्रमुख, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.
३. परीक्षा विभागातील उपविभाग, प्रस्तुत विद्यापीठ